## बावीसाव्या अधिमंडळाच्या वार्षिक सर्वसाधारण सभेची नोटीस

संस्थेच्या सर्व सभासदांना कळविण्यात येते की, संस्थेच्या अधिमंडळाची २२ वी वार्षिक सर्वसाधारण सभा **शनिवार, दि. ०९/०९/२०२३** रोजी सायंकाळी ४.०० वा. संस्थेचे अध्यक्ष श्री. जनार्दन बजरंग झोरे यांचे अध्यक्षतेखाली सानपाडा देवस्थान ट्रस्ट, दत्त मंदिर, सानपाडा रेल्वे स्टेशन जवळ, सानपाडा, नवी मुंबई – ४०० ७०५ या ठिकाणी होणार आहे. तरी सर्व सभासदांनी सभेस उपस्थित रहावे, हि विनंती.

## सभेपुढील विषय

१. दि. २४/०९/२०२२ रोजी झालेल्या २१ व्या अधिमंडळाच्या वार्षिक सभेचे इतिवृत्त वाचून कायम करणे.
२. संचालक मंडळाने सादर केलेला दि. ३१/०३/२०२३ अखेरचा वार्षिक अहवाल, नफा तोटा पत्रक व ताळेबंद पत्रकास मंजूरी देणे.
३. सन २०२२–२३ या अहवालसालातील संचालक मंडळाने सुचविलेल्या नफा विभागणी व लाभांशास मंजूरी देणे.
४. सन २०२३–२४ च्या अंदाज पत्रकास मंजूरी देणे व गतवर्षात अंदाजपत्रकापेक्षा अधिक झालेल्या खर्चास मंजूरी देणे.
५. सन २०२२–२३ या आर्थिक वर्षाच्या वैधानिक लेखापरिक्षण अहवालाची नोंद घेणे.
६. सन २०२३–२४ या आर्थिक वर्षासाठी केलेल्या वैधानिक लेखापरिक्षकाची नेमणूक करणे व त्याचा मेहनताना ठरविणे.
७. सन २०२१–२२ या आर्थिक वर्षाच्या लेखापरिक्षणाचा दोष दुरूस्ती अहवाल व त्यावरील निर्देशांची नोंद घेऊन कार्यवाही करणे.
८. सभेस अनुपस्थित असणाऱ्या सभासदांची अनुपस्थिती क्षमापित करणे.
९. मा. अध्यक्षांच्या परवानगीने येणाऱ्या इतर विषयांवर चर्चा करणे.

संचालक मंडळाच्या अनुज्ञेने
सचिव
**श्री. भागुजी धोंडीबा झोरे**

ठिकाण : मुंबई
दिनांक : २१/०८/२०२३

## विशेष सूचना

१) गणसंख्येअभावी तहकूब झालेली सभा पोटनियमातील तरतुदीप्रमाणे त्याच दिवशी, त्याच ठिकाणी अर्ध्या तासाने घेण्यात येईल व अशा तहकूब झालेल्या सभेला गणसंख्येची आवश्यकता असणार नाही.

२) सभासदांना काही प्रश्न विचारायचे असल्यास त्यांनी दिनांक ०५ सप्टेंबर २०२३ पुर्वी पत्राद्वारे मुख्य कार्यालयात किंवा jaimalharpatsanstha@yahoo.com या ई–मेल वर पाठविण्यात यावेत.